‘ प्रेसनोट’

दिनांक : २८/०१/२०२६

| | |
|---|---|
| युनिट | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती |
| आरोपीलोकसेवकाचेनाव, पद, वर्ग व कार्यालय | श्री. अजय विलास चौधरी वय ३३ वर्ष,<br>पद–सहाय्यक अभियंता,महावितरण कार्यालय अंजनगावसुर्जीवर्ग २,<br>रा.श्री.खेडकर यांच्याघरी किरायाणे गणेश नगर,अंजनगावसुर्जी<br>मुळ पत्ता मु. भादोड पोस्ट पाणवाडी ता. आर्वी जि.वर्धा |
| मागणी केलेलीलाचेचीरक्कम | ४५,,०००/– रु. |
| तडजोडी अंती मागणी केलेली लाचेची रक्कम | ३५,०००/–रु |
| स्विकारलेलीलाचेचीरक्कम | ३५,०००/–रु |
| घटनास्थळ | महावितरण कार्यालय,अंजनगावसुर्जी |
| घटनातारीख व वेळ | दि.२८/०१/२०२६चे १३.४० वा.ते १३.४८वा. दरम्यान |

**थोडक्यातहकीकत:**–दिनांक २८/०१/२०२६ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार हे दि.२७/०१/२०२६ रोजी त्यांचे घरी हजर असताना दुपारी १२.००ते १२.३० वा.च्या दरम्यान अंजनगाव महावितरण चे इंजिनियर अजय चौधरी व त्याचे सोबत इतर चार पाच कर्मचारी असे तक्रारदार यांचे घरी आले व तक्रारदार यांना म्हणाले की, “तुमचे घरी लावलेले इलेक्ट्रीक मिटर मधील वायर कट करून तुम्ही मिटर सोबत छेडछाड करुन विज चोरी केली आहे ” असे म्हटले,तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना म्हटले की, मी असे काही केले नाही तरीपण त्यांनी तक्रारदार यांचे काहीही न ऐकता त्यांचे घरातील इलेक्ट्रीक मिटर काढुन घेतले व मला ऑफीसला येवुन भेट असे म्हणुन निघुन गेले. त्यानंतर तक्रारदार दुपारी ०२/०० वा. चे दरम्यान महावितरण कार्यालय अंजनगाव सुर्जी येथे जावुन इंजिनीयर अजय चौधरी यांना भेटले असता चौधरी साहेबांनी तक्रारदार यांना म्हटले की, “ तुमचे घरी लावलेले इलेक्ट्रीक मिटर मधील वायर कट करून तुम्ही मिटर सोबत छेडछाड करुन विज चोरी केली आहे त्यामुळे तुमचे मिटर काढुन आणले असुन तुमच्यावर विजचोरीचा गुन्हा दाखल होईल व दंड सुदधा आकारण्यात येईल, जर तुमच्यावर गुन्हा दाखल करायचा नसेल तर तुम्हाला मला ४५,०००/– रु दयावे लागेल ” अशी लाचेची मागणी केली. अशी तक्रार दिली

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक २८/०१/२०२६ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान आलोसे यांनी तक्रारदार यांचेवर गुन्हा दाखल न करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती ३५,०००/–रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर आयोजित सापळा कारवाई दरम्यान आलोसे इंजिनीयर अजय चौधरीयांनी तक्रारदार यांचेकडून ३५,०००/–रु रुपये लाच स्विकारले वरुन आलोसे इंजिनीयर अजय चौधरी,महावितरण कार्यालय अंजनगावसुर्जी यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेविरुध्द पो.स्टे.अंजनगावसुर्जी अमरावती ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती चे पोलीस अधीक्षक श्री.बापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक श्री.सचिंद्र शिंदे, पोलीस उपअधीक्षक श्री.सुनिल किनगे यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.ज्ञानोबा फड पो.नि..चित्रा मेसरे, पो.शि.शैलेश कडू,वैभव जायले, चालक पो.उ.नि.सतीश किटूकले, यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकिय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :–१)श्री.बापू बांगर, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती परिक्षेत्र, अमरावती
मो.नं.९०११३२३४२६
२) श्री.सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती परिक्षेत्र, अमरावती
मो.नं.९७६४२१०४८५
३) श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. अमरावती परिक्षेत्र, अमरावती
मो.नं.९८२३१११११५५, ७५१७५७१०६४

कार्यालयाचा पत्ता :–ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, ललीत सेंटर परांजपे कॉलनी, अमरावती
टोल फ्री क्रमांक :– १०६४, दुरध्वनी क्रमांक ०७२१–२५५३०५५

(ज्ञानोबा फड)
पेलीसनिरीक्षक,
ॲन्टीकरप्शनब्युरो, अमरावती